नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १४८ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




बुधवार, दि. २९ एप्रिल २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## धर्म विचारला, कलमा म्हणायला लावला, नंतर चाकूने हल्ला

### मुंबईत २ सुरक्षारक्षकांवर अ‍ॅटॅक; ATS म्हणाली- ISIS ची कागदपत्रे मिळाली, एकट्याने कट रचला



मुंबई : (स. गांवकरी)

मुंबईजवळील मीरा रोड परिसरात घडलेल्या चाकूहल्ला प्रकरणाने आता अत्यंत गंभीर वळण घेतले आहे. सुरुवातीला साधा गुन्हा वाटणाऱ्या या घटनेचा तपास आता दहशतवादविरोधी पथकाकडे (ATS) सोपवण्यात आला आहे. आरोपीच्या घरातून काही संशयास्पद आणि कट्टर विचारसरणीशी संबंधित साहित्य सापडल्याने तपास यंत्रणा अधिक सतर्क झाल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ गुन्हेगारी नव्हे, तर व्यापक सुरक्षेच्या दृष्टीने पाहिले जात आहे. या घटनेतील आरोपी 31 वर्षीय जुबेर अन्सारी असल्याचे समोर आले आहे. घटना घडल्यानंतर काही तासांतच नया नगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे त्याला अटक केली. त्यानंतर त्याला ठाणे न्यायालयात हजर करण्यात आले असून, न्यायालयाने त्याला 4 मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, हा प्रकार 27 एप्रिल रोजी पहाटे 4 वाजण्याच्या सुमारास मीरा रोड (पूर्व) येथील नया नगर भागात घडला. घटनेच्या वेळी राजकुमार मिश्रा आणि सुब्रतो रमेश सेन हे दोन सुरक्षा रक्षक ड्युटीवर होते. आरोपीने सुरुवातीला परिसरात येऊन मशिदीचा रस्ता विचारल्याचे सांगितले जाते. काही वेळानंतर तो पुन्हा आला आणि एका रक्षकाचा धर्म विचारल्यानंतर अचानक चाकूने हल्ला केला. त्यानंतर तो केबिनमध्ये शिरला आणि दुसऱ्या रक्षकाला कलमा म्हणण्यास सांगितले. तो रक्षक ते म्हणू शकला नाही, तेव्हा त्याच्यावरही हल्ला करण्यात आला.

#### जुबेर अन्सारी विज्ञान शाखेचा पदवीधर

पोलिसांच्या माहितीनुसार, जुबेर अन्सारी हा विज्ञान शाखेचा पदवीधर असून तो काही वर्षे अमेरिकेत वास्तव्यास होता. नोकरी न मिळाल्यामुळे तो भारतात परतला आणि मीरा रोड परिसरात एकटाच राहत होता. तो ऑनलाइन केमिस्ट्रीचे वर्ग घेत होता. मात्र, याच काळात तो इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून कट्टर विचारांकडे वळला असावा, असा संशय तपास यंत्रणांना आहे.

#### नोट्समध्ये काही संवेदनशील शब्द

सध्या तपास यंत्रणा आरोपीचा मोबाईल, इंटरनेट वापर आणि त्याचे संपर्क यांचा बारकाईने अभ्यास करत आहेत. त्याने हा हल्ला एकट्याने केला की त्यामागे इतर कोणाचा सहभाग आहे, हे तपासात स्पष्ट होणार आहे. तसेच, त्याच्या नोट्समध्ये काही संवेदनशील शब्द आढळल्यामुळे त्याचा उद्देश आणि पार्श्वभूमी समजून घेण्याचा प्रयत्न सुरू आहे. या प्रकरणात कोणतीही शक्यता नाकारली जात नसून, सर्व बाजूंनी तपास सुरू असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली आहे.

## विदर्भ-मराठवाड्यात उन्हाचा कहर

### लातूरमध्ये उष्माघाताचा चौथा बळी

लातूर : (स. गांवकरी)

राज्यात एप्रिलच्या शेवटच्या आठवड्यात सूर्याने आग ओकायला सुरुवात केली असून, विदर्भ आणि मराठवाडा अक्षरशः होरपळून निघत आहे. लातूर जिल्ह्यात उष्माघाताने मृत्यू होण्याचे सत्र सुरूच असून, आज निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे एका ७५ वर्षीय वृद्ध शेतकऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे जिल्ह्यातील उष्माघाताच्या बळींची संख्या आता चारवर पोहोचली असून नागरिक भयभीत झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, त्र्यंबक नारायण बेळंबे (७५) हे दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास आपल्या शेतात जनावरांसाठी चारा कापण्याचे काम करत होते. प्रखर उन्हामुळे काम करत असतानाच त्यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. नातेवाईकांनी त्यांना तातडीने पानचिंचोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले, मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या मृत्यूचे कारण उष्माघात असावे, असा प्राथमिक संशय व्यक्त केला जात आहे. गेल्या काही दिवसांत लातूर जिल्ह्यात तीव्र उष्णतेमुळे मृत्यू होण्याच्या चार घटना समोर आल्या आहेत. एरंडी येथील २५ वर्षीय शेतकरी महेश लिंबाजी इंगोले शेतातील काम करून घरी परतल्यानंतर चक्कर येऊन त्यांचा मृत्यू झाला. गोंद्री येथील एका ९



महिन्यांच्या बाळाचा तीव्र उन्हामुळे प्रकृती बिघडून मृत्यू झाल्याचा संशय आहे. औराद शहाजनी येथे एका ६० वर्षीय शेतकऱ्याचा प्रखर उन्हाचा फटका बसून मृत्यू झाला. तर आज पानचिंचोली येथे ७५ वर्षीय त्र्यंबक नारायण बेळंबे यांचा शेतात चारा कापताना उष्माघाताने मृत्यू झाला. वाढत्या तापमानामुळे विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतमजुरांना मोठा धोका निर्माण झाला आहे. अकोल्यात तापमान ४७ अंशांवर पोहोचल्याने प्रशासनाने 'रेड अलर्ट' जारी केला आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यंत आवश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका. तहान नसली तरी दर अर्ध्या तासाने पाणी प्या. लिंबू पाणी, ताक आणि ओआरएस (ORS) चा वापर करा. घराबाहेर पडताना पांढऱ्या रंगाचे, सुती आणि सैल कपडे परिधान करा. डोक्यावर टोपी किंवा रुमाल ठेवा. चक्कर येणे, ताप, मळमळ किंवा खूप घाम येणे अशी लक्षणे दिसल्यास तातडीने जवळच्या रुग्णालयात संपर्क साधा, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### VSR विमानात पार्थ बसले तरी कसे?

मुंबई (स. गांवकरी) : अजित पवार यांच्या विमान अपघातावरुन विविध प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आमदार रोहित पवारांनी या अपघातावरुन व्हिएसआर कंपनीविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. व्हिएसआर कंपनीच्या मालकाविरोधात रोहित पवार सातत्याने शंका उपस्थित करत आहेत. अशात पार्थ पवारांनी याच कंपनीच्या विमानातून प्रवास केल्यानंतर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. तसेच, सरकारी अधिकाऱ्यांची खासगी कामासाठी उपस्थिती आणि चार्टर प्रवासावर त्यांनी आक्षेप घेतला. अंजली दमानिया यांनी एक्सवर एक पोस्ट करुन पार्थ पवार यांच्या व्हिएसआर कंपनीच्या विमानातून केलेल्या प्रवासावर प्रश्न उपस्थित केले. “VSR कंपनीच्या विमान अपघातात तीन महिन्यापूर्वी वडिलांचा मृत्यू झाला, त्याच विमानात मुलगा जातो? त्या VSR कंपनी च्या चौकशीची मागणी करायचे सोडून, त्याच विमानात पार्थ पवार निर्धास्तपणे जातो?”, असा सवाल अंजली दमानिया यांनी उपस्थित केला आहे. दमानिया यांनी या पोस्टच्या सोबतीने प्रवाशांची माहिती असणारी शीट देखील जोडली आहे.

### राज्याचा स्वतंत्र बियाणे कायदा?

मुंबई (स. गांवकरी) : शेतकऱ्यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाण- घेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण मिळावे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावे. बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्य सरकार स्वतंत्र बियाणे कायदा करेल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. महाराष्ट्र विधी मंडळाच्या २०२५ च्या दुसऱ्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत या बाबत आश्वासन दिले होते. तसेच बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी आमदार सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते. बैठकीस दूरदृश प्रणालीद्वारे राज्यमंत्री आशिष जयस्वाल उपस्थित होते. राज्यासाठीच्या स्वतंत्र बियाणे कायद्यात बोगस बियाणांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई मिळावी, यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित व्हावी. महाबीज कंपनीची कार्यक्षमता वाढवा. नियमभंग करणाऱ्या बियाणे कंपन्यांवर कठोर कारवाई करा, अशा सूचनाही भरणे यांनी दिल्या.

### ३६६ अन्नप्रक्रिया उद्योगांची उभारणी

अहिल्यानगर(स. गांवकरी) : प्रधानमंत्री सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योग (पीएमएफएमई) योजनेच्या अंमलबजावणीत अहिल्यानगर कृषी विभागाने राज्यात सर्वाधिक ३६६ प्रकल्पांना मंजुरी देऊन ते उभारण्यात आले आहेत. या कामगिरीबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांचे व त्यांच्या पथकाचे राज्याचे कृषी संचालक (प्रक्रिया व नियोजन) विनयकुमार आवटे यांनी विशेष अभिनंदन केले आहे. गेल्या वर्षभरात उभारलेल्या ३६६ प्रकल्पांना बँकांमार्फत ४८.७० कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले तर १८.४३ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले आहे. जिल्ह्यात गेल्या तीन वर्षात १८०१ प्रकल्पांना २०७ कोटी ७९ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. त्यासाठी उद्योजकांना ७५ कोटी ९७ लाख रुपयांचे अनुदानही देण्यात आले आहे. अन्नप्रक्रिया उद्योगासाठी अहिल्यानगर जिल्ह्याला ४७८ प्रकल्पांचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी ३६६ प्रकल्पांना मंजुरी देऊन ते पूर्ण करण्यात आले आहेत.

## ‘व्हीएसआर’ कंपनीला तीन महिन्यांत १४५ कोटी रुपये दिले ?

मुंबई : (स. गांवकरी)

‘व्हीएसआर’ विमान कंपनीला तीन महिन्यांत १४५ कोटी रुपये दिले आहेत. अपघाताच्या अगोदरच्या दिवशी १५.७२ कोटी रुपये. अपघाताच्या दिवशी ९.८१ कोटी रुपये आणि अपघाताच्या दुसऱ्या दिवशी १६.८६ कोटी रुपयांचे बिल काढण्यात आले. सर्वसाधारण महिन्याला दहा कोटी रुपयांचे बिल निघत असताना जानेवारी ते मार्च महिन्यांत अचानक इतकी मोठी रक्कम का देण्यात आली, असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस, आमदार रोहीत पवार यांनी उपस्थितीत केला आहे. तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ‘व्हीएसआर’ कंपनीच्या विमान अपघातात मृत्यू झाला होता. या कंपनीला जानेवारी ते मार्च, या तीन महिन्यांत सुमारे १४५ कोटी रुपयांची बिले काढण्यात आली आहेत, याकडे पवार यांनी लक्ष वेधले आहे. महाराष्ट्र शासनाकडून २०२५ – २६



या आर्थिक वर्षात विमान कंपन्यांची २१० कोटी रुपयांहून अधिकची बिले काढली आहेत. एप्रिल २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत जवळपास ६४ कोटी रुपयांची बिले काढली गेली आहेत. म्हणजे दर महिन्याला सरासरी ८ कोटी रुपयांची बिले काढली आहेत. त्यानंतर जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांची अनुक्रमे ४२ कोटी रुपये, ३२ कोटी रुपये आणि ७१ कोटी रुपये, अशी एकूण तब्बल १४५ कोटी रुपयांहून अधिकची बिले काढण्यात आली आहेत.

## भाजपकडून विधान परिषदेसाठी ५ जणांची नावे निश्चित

### निष्ठावंतांना कौल; विवेक कोल्हे, प्रमोद जठार, माधवी नाईकांसह सुनील कर्जतकरांना संधी

मुंबई : (स. गांवकरी)

येत्या विधान परिषद निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने आपल्या उमेदवारांच्या नावांची अधिकृत घोषणा केली आहे. पक्षाच्या केंद्रीय संसदीय समितीने मंजुरी दिल्यानंतर, पाच मुख्य जागांसाठी आणि एका जागेच्या पोटनिवडणुकीसाठी नावे जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या प्रज्ञा सातव आणि अहिल्यानगरमधील युवा नेते विवेक कोल्हे यांच्या नावांचा समावेश असल्याने राजकीय चर्चांना उधाण आले आहे.

भाजपने जाहीर केलेल्या यादीत संघटनात्मक कामात सक्रिय असलेल्या नेत्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.



१. प्रमोद जठार (सिंधुदुर्ग): कोकणातील महत्त्वाचे नेते म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जठार यांना संधी देऊन भाजपने कोकण किनारपट्टीवर पक्षाची पकड मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे.
२. विवेक कोल्हे (अहिल्यानगर): कोपरगावमधील कोल्हे घराण्याचे वारसदार आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव विवेक कोल्हे यांना विधान परिषदेवर पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
३. संजय भेंडे (नागपूर): भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आणि नागपूरचे माजी जिल्हाध्यक्ष असलेल्या भेंडे यांना संधी देऊन विदर्भातील संघटनात्मक ताकद वाढवण्यावर भर दिला आहे.
४. माधवी नाईक: गेल्या अनेक वर्षांपासून भाजपच्या संघटनात्मक बांधणीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या माधवी नाईक यांना पक्षाने मोठे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.
५. सुनील कर्जतकर: पक्षाच्या विश्वासू आणि दीर्घकाळ काम करणाऱ्या नेत्यांपैकी एक असलेल्या कर्जतकर यांच्या नावावरही मोहोर उमटवण्यात आली आहे.

काँग्रेसच्या विधान परिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देऊन भाजपमध्ये दाखल झालेल्या प्रज्ञा सातव यांना भाजपने त्यांच्याच रिक्त झालेल्या जागेवर पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी दिली आहे. पक्षांतराचा हा निर्णय त्यांच्या पथ्यावर पडल्याचे बोलले जात आहे. अहिल्यानगर जिल्ह्याच्या राजकारणात कोपरगावचे 'काळे-कोल्हे' हे द्वंद्व सर्वश्रुत आहे. विधानसभा निवडणुकीच्या वेळी महायुतीचा धर्म पाळत कोल्हेंनी संयम राखला होता. वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची घेतलेली भेट ही उमेदवारीसाठी महत्त्वाची ठरल्याचे मानले जात आहे.

## मंत्रालयात दिवसभर टाकीत मेलेल्या मांजराची चर्चा

### कर्मचारी अधिकाऱ्यांना पाण्याची चिंता, उकळून पाणी पिणार!



मुंबई : (स. गांवकरी)

राज्याचा कारभार ज्या इमारतीतून हाकला जातो ती नरिमन पॉईंट परिसरातील मादाम कामा मार्गावरील सात मजली इमारत म्हणजे आपले मंत्रालय. मुख्यमंत्री, सर्व मंत्री मुख्य सचिव आणि सचिव याच इमारतीतून राज्याचा कारभार पाहतात. या मंत्रालयात दिवसाला पाच ते सहा हजार नागरिक भेट देतात. सात हजार तर कर्मचारी आणि अधिकारी आहेत. या मंत्रालयात गेली दोन दिवस एका मेलेल्या मांजरीचा चर्चा सुरू आहे. तसे तर मंत्रालय परिसरात उंदीर, घुशी, मांजरी भटकी कुत्री पदोपदी बघायला मिळतात. कुत्री मांजरी तर पोलिस आणि कर्मचाऱ्यांनी पाळली आहेत. परदेशातील एखादे शिष्टमंडळ मंत्रालयात आले तर त्यांना ह्या भटकी कुत्री मांजरी यांचे हमखास दर्शन होते तर गेली दोन असे झाले. मंत्रालयाला पाणी पुरवठा करणाऱ्या उच्च आणि भूमिगत जलकुंभात मेलेले मांजर पडल्याने मंत्रालयाला अशुद्ध पाणी पुरवठा झाला. हे पाणी पिऊन अनेक कर्मचारी, अधिकारी व पत्रकार यांना जुलाब, उलटया असा त्रास झाल्याचा संदेश गेली तीन दिवस समाज माध्यमांवर फिरत आहे. अशा प्रकारे या संदेशात कोणतेही तथ्य नाही, असा खुलासा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना करावा लागला. या संदेशामुळे गेली तीन दिवस मंत्रालयात मात्र मेलेल्या मांजरीची चर्चा सुरु होती.


मुंबईचे तापमान ४० डिग्री सेल्सीअंशच्या पार गेले आहे. बाहेर कडाक्याचे उन्ह पडत असल्याने अनेकांना पोटाचे विकार सुरु झाले असल्याचे डॉक्टर सांगत आहेत. अशा वातावरणात मंत्रालयाला पाणी पुरवठा करणाऱ्या जलकुंभ (टाक्या) आणि भूमिगत जलकुंभ यात मेलेले मांजर पडल्याने संपूर्ण मंत्रालयाला अशुद्ध पाणी पुरवठा झाला आहे. या अशुद्ध पाणी पुरवठयामुळे अनेकांना पोटाचा त्रास सुरु झाला आहे. उलट्या, जुलाब होत असल्याच्या तक्रारी काही कर्मचारी व पत्रकारांनी केलेल्या आहेत. असा संदेश गेली दोन दिवस समाजमाध्यमांवर फिरत आहे.

मंत्रालयातील पाणी प्यायल्याने हा त्रास झाल्याची कोणतीही लेखी तक्रार नाही पण मंत्रालयातील अशुद्ध पाणी प्यायल्याने हा त्रास झाल्याची चर्चा समाजमाध्यमांवर वाऱ्यासारखी पसरली. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्थानिक कार्यकारी अभियत्यांना या संदेशावर खुलासा करावा लागला. मंत्रालयातील जलकुंभ वेळच्या वेळी स्वच्छ केले जातात. मुंबई पालिकेच्या सूचनेवरुन त्यावर लोखंडी जाळ्या बसवण्यात आलेल्या आहेत. या जलकुंभात मांजर पडू शकत नाही आणि पडलेले नाही, अशा शब्दात ही सार्वजनिक बांधकाम विभागाने हे वृत्त फेटाळले पण या निमित्ताने दोन दिवस मंत्रालयात मेलेल्या मांजरीची चर्चा जोरात सुरु होती.

## नकळतपणे VSR चे विमान माझ्यासाठी बुक केले : पार्थ पवार

पुणे : (स. गांवकरी)

ज्या 'व्हीएसआर' (VSR) कंपनीच्या विमान अपघातात तीन महिन्यांपूर्वी अजित पवार यांचा दुर्दैवी मृत्यू झाला, त्याच कंपनीच्या विमानातून प्रवास केल्यामुळे पार्थ पवार वादाच्या भोवऱ्यात सापडले होते. यावर मौन सोडत पार्थ पवार यांनी हा सर्व प्रकार 'प्रशासकीय चूक' असल्याचे म्हटले असून, संबंधित ट्रॅव्हल एजंटवर कारवाई केल्याचे स्पष्ट केले आहे. गत २८ जानेवारी रोजी बारामती विमानतळाजवळ 'व्हीएसआर' कंपनीच्या विमानत अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले होते. या घटनेला आज तीन महिने पूर्ण झालेत. या घटनेनंतर रोहित पवार यांनी विमानाची देखभाल आणि कंपनीच्या सुरक्षेबाबत मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले होते. एकीकडे रोहित पवार व्ही. के. सिंग आणि 'व्हीएसआर' कंपनीला घेरण्याचा प्रयत्न करत असताना, दुसरीकडे अजित पवारांचे सुपुत्र पार्थ पवार यांनी त्याच कंपनीच्या विमानातून प्रवास केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या. यावर आता पार्थ पवारांनी स्पष्टीकरण दिले आहे. पार्थ पवार यांनी सोशल मीडियाद्वारे आपली बाजू मांडताना सांगितले की, "पुण्यातील मोदी बाग येथे पवार साहेबांना भेटण्यासाठी तातडीने पोहोचायचे असल्याने



मी माझ्या कार्यालयाला विमानाची व्यवस्था करण्यास सांगितले होते. शेवटच्या क्षणी झालेल्या व्यवस्थेमुळे नकळतपणे VSR Aviation चे विमान माझ्यासाठी बुक करण्यात आले. विमानतळावर पोहोचेपर्यंत आणि विमानापर्यंत जाईपर्यंत हे विमान VSR Aviation चे असल्याची मला कोणतीही कल्पना नव्हती" हा प्रकार गंभीर असल्याचे मान्य करत पार्थ पवार यांनी कडक पावले उचलली आहेत. "ही केवळ प्रशासकीय पातळीवरील चूक होती. याची मी गंभीर दखल घेतली असून संबंधित विमान बुक करणाऱ्या एजंटशी असलेला करार आम्ही तत्काळ रद्द करत आहोत. तसेच माझ्या कर्मचारीवर्गाला आणि सहकाऱ्यांना अशा प्रकारच्या चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी अधिक सतर्क राहण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत," असेही पार्थ पवार यांनी सांगितले.

# वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

## सारडा महाविद्यालयाची क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी-आमदार संग्राम जगताप

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



एखादे स्पर्धेची उंची गाठणे सोपे नाही.त्यासाठी खेळाडूंनी सातत्याने सराव करणे आवश्यक आहे.खेळाडूंनी यशस्वी व्हावे. यासाठी पालकवर्ग व शिक्षक हे देखील परिश्रम घेत असतात.मुलींना देखील क्रीडा क्षेत्रात चांगल्या संधी निर्माण झाल्या आहेत.हिंद सेवा मंडळाने सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना खेळासाठी मोठे प्रोत्साहन दिले आहे.

त्यामुळेच सर्व क्रीडाप्रकारात सारडा महाविद्यालयातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडले आहेत. सारडा महाविद्यालयाने क्रीडा क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी केली आहे.असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या सारडा महाविद्यालयात वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून व हनुमानाच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले.

याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव, सामाजिक कार्यकर्ते अनिल ढवण,हिंद सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी,ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, माजी कार्याध्यक्ष अँड.अनंत फडणीस,प्रा. ज्योती कुलकर्णी,जगदीश झालानी, प्राचार्य प्रा.डॉ.माहेश्वरी गावित कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे, पर्यवेक्षक प्रा.कुमावत,प्रबंधक अशोक असेरी,माजी विद्यार्थी व खेळाडू प्रा.डॉ.रोहित आदलिंग, प्रा. संजय धोपावकर,प्रा.संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात, प्रा.अक्षय कर्डिले,प्रा.योगीता गावडे आदी उपस्थित होते.

उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले, "शरीर निरोगी व सुदृढ राहण्यासाठी खेळ खेळणे आवश्यक आहे.सारडा महाविद्यालयात शिक्षणाबरोबरच क्रीडा क्षेत्राला प्राधान्य दिले जात आहे."

सुमतीलाल कोठारी म्हणाले, "विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळाला महत्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा क्षेत्र महत्त्वाचे आहे.वर्षभरात क्रीडा क्षेत्रात विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केली आहे.त्यामुळे क्रीडा क्षेत्रात जिल्ह्यात सारडा महाविद्यालयाचा मोठा नावलौकिक आहे." प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या,"शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा क्रीडा अहवाल सादर करताना अत्यंत आनंद वाटत आहे.कनिष्ठ महाविद्यालयाने यावर्षी गतवर्षी पेक्षा खूप मोठ्या प्रमाणात विविध शालेय स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाने यश संपादन केले. या वर्षी ६५ क्रीडा प्रकारात मुले व मुली यांनी म.न.पा (जिल्हा) स्पर्धेत प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळून विभागीय पातळीवर २२० खेळाडूंची तसेच २१ खेळाडूची राज्यस्तरीय विविध खेळामध्ये तर ७ खेळांडूची राष्ट्रीय पातळीवर निवड झाली.

वरिष्ठ विभागात यावर्षी अखिल भारतीय आंतर विद्यापीठ व आंतरविभागीय स्पर्धेत नेत्रदीपक प्रगती करताना अहिल्यानगर विभागाच्या ५३ खेळाडूंची निवड झाली.तर आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संघात दहा खेळाडूंची निवड झाली."

यावेळी प्रा.रोहित आदलिंग यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, ज्येष्ठ मार्गदर्शक ब्रिजलाल सारडा यांनी शुभेच्छा दिल्या. या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात विद्यार्थ्यांना मेडल,ट्रॅक सूट व ब्लेजर देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी सारडा महाविद्यालयातील खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.



ठाणे : दिवा स्टेशनबाहेर भीषण अग्नितांडव पहावयास मिळाला. धमाका चायनीज कॉर्नर मध्ये गॅस गळतीमुळे लागलेल्या आगीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गॅस सिलिंडरने अचानक पेट घेतल्याने प्रवाशांची मोठी धावपळ उडाली. सुदैवाने नागरिकांनी तत्परतेने पावले उचलल्यामुळे मोठा अनर्थ टळला. (फोटो - संतोष पडवळ)

# थोडक्यात पण महत्वाचे



## शिऊर येथे दिड लाख रुपयांच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी

जामखेड तालुका (स. गांवकरी) : जामखेड तालुक्यातील शिऊर येथे मध्यरात्रीच्या सुमारास निकम वस्ती या ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी फीर्यादी अंकुश रामभाऊ निकम (वय ७५) यांच्या घरात प्रवेश करून १ लाख ५६ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने चोरुन नेले आहेत. या प्रकरणी अज्ञात चोरट्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फीर्यादी अंकुश रामभाऊ निकम व त्यांचा मुलगा शुक्रवारी रात्री आपल्या शेतात पाणी देण्यासाठी गेले होते. यावेळी त्यांनी आपल्या घराला बाहेरुन कडी लावलेली होती तर घरामध्ये त्यांची पत्नी व सुन झोपलेले होते. शनिवारी मध्यरात्री १ ते २ वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्याने घराची कडी उघडुन घरात प्रवेश करून कपाटातील १ लाख ५६ हजारांचे दागिने लंपास केले. पहाटे शेतातुन मोटार बंद करण्यासाठी घरी फोन लावला असता घरात चोरी झाली असल्याचे लक्षात आले. याप्रकरणी फीर्यादी अंकुश रामभाऊ निकम (वय ७५) रा. शिऊर, ता. जामखेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक दशरथ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पो. ना. विद्या बांगर या करत आहेत. जामखेड तालुक्यात मागिल महीन्यात २५ मार्च रोजी वाघा येथे घरफोडी करुन ३ लाख ९६ हजारांची घरफोडी झाली होती. या महिन्यात दि १२ एप्रिल रोजी बावी येथे अज्ञात चोरट्यांनी ७२ हजारांचा ऐवज लंपास केला होता. आघी येथे दि १९ एप्रिल रोजी रात्री महीलेच्या गळ्यातील धुमस्टाईल चोरी करण्याचा प्रयत्न झाला होता. त्यातच आता पुन्हा शिऊर या ठिकाणी दिड लाखांची चोरी झाली यावरुन ग्रामिण भागात चोरीच्या घटना वाढल्याचे दिसून येत आहे. पोलीसांनी तातडीने या चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी ग्रामस्थांन मधुन होत आहे.

## अहिल्यानगर पोलीस दलात महत्त्वाचे प्रशासकीय फेरबदल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने अहिल्यानगर पोलीस दलात महत्त्वाचे प्रशासकीय फेरबदल करण्यात आले आहेत. दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी करण्यात आलेल्या या बदलांनुसार लोणी पोलीस स्टेशनच्या प्रभारी अधिकारीपदी सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज आठरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवराज आठरे हे यापूर्वी आर्थिक गुन्हे शाखेत (EOW) कार्यरत होते. त्यांच्या नियुक्तीमुळे लोणी पोलीस स्टेशनच्या कारभाराला अधिक बळ मिळणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. दरम्यान, लोणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांना पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली असून त्यांची बदली मुंबई येथे करण्यात आली आहे. हे फेरबदल पोलीस दलातील नियमित प्रशासकीय प्रक्रियेचा भाग असून जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक प्रभावी करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात करण्यात आल्याची माहिती पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे. या बदलांमुळे जिल्ह्यातील पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेत वाढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## गोदा ते नर्मदा जलयात्रेचे भव्य स्वागत, पवित्र जल कलाशयाचा स्वीकार



अहिल्यानगर (स. गांवकरी) : गोदा ते नर्मदा जलयात्रेचे अहिल्यानगर येथे आगमन होताच उत्साह पूर्ण वातावरणात भव्य स्वागत करत पवित्र जल कलाशयाचा स्वीकार करण्यात आला. या स्वागत सोहळ्यात पदाधिकारी कार्यकर्ते तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत जलसंवर्धन पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत पाणी व्यवस्थापनाचा संदेश प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. या उपक्रमातून समाजातील प्रत्येक घटकाला पाण्याचे महत्व पटवून देत संवर्धनासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात आली. गोदा ते नर्मदा जल यात्रा ती श्रद्धा परंपरा आणि सामाजिक जागृती यांचा संगम ठळक असून जल व्यवस्थापनाचा व संवर्धनाचा पाणी वाचवा जीवन वाचवा हा संदेश जनमानसात दृढ करण्यासाठी हा उपक्रम अत्यंत परिणामकारक ठरत आहे. याप्रसंगी खासदार रामराव वडकुते, आमदार संग्राम जगताप मा.खा. सुजय विखे पाटील, महापौर सौ. ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव आयुक्त यशवंत डांगे व महायुतीचे जिल्हा पदाधिकारी, नगर महानगरपालिकेतील सर्व नवनिर्वाचित नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.तसेच निमगाव वाघा भजनी मंडळ यात सहभागी होते. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज पुतळयास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.त्यानंतर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.तसेच श्री विशाल गणपतीची आरती करण्यात आली.

# शेततळ्यात बुडून दोन लहान मुलांचा दुर्दैवी मृत्यू

ओतूर : (स. गांवकरी)



जुन्नर तालुक्यातील बल्लाळवाडी गावच्या हद्दीत शेततळ्यात बुडून दोन लहान मुलांचा दुर्दैवी मृत्यू झाला असल्याची दुर्दैवी घटना मंगळवार दि. २८ एप्रिल रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडल्याचे समोर आले आहे. शेततळ्यात बुडून मृत झालेल्या मुलांची नावे सोहम जयसिंग नवले (वय १२) आणि अभि महेश पवार (वय १०) दोघे ही राहणार पांगरीमाथा, बल्लाळवाडी ता. जुन्नर येथील आहेत. बल्लाळवाडी येथील धरणाच्या मार्गावर सामाईक म्हणून परीसरात डॉ. विनोद ढवळे यांच्या दवाखान्याचे बांधकाम व इतर सुधारणेची कामे सुरू असून येथेच बाजूला असलेल्या शेता तळ्यात ही लहान मुले तळ्यात बुडाल्याची दुदैवी घटना मंगळवारी दुपारी साडेबारा वाजे दरम्यान उघड झाली आहे . या घटनेची माहिती मिळताच ओतूर पोलीसांचे पथक व रेस्क्यू टीम यांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन स्थानिक नागरिकांच्या मदतीने संबंधित मुलांचे मृतदेह शेततळ्यातून पाण्याबाहेर काढले. बल्लाळवाडी येथे घडलेल्या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून बल्लाळवाडी ग्रामस्थांमध्ये शोककळा पसरली आहे. शेततळे, नदी, जलतरण, तलाव, केटी बंधारे अशा ठिकाणी पाण्यात बुडून जीवीत हानी टाळण्यासाठी अंघोळीसाठी जाणे टाळावे किंवा पालकांनी बरोबर रहावे आवश्यक काळजी घ्यावी असे आवाहन बल्लाळवाडी सरपंच संजय नायकोडी यांनी केले आहे.

# सह्याद्री स्टार्टअप्सकडून ड्रोन इनोव्हेशन उपक्रम

पुणे : (स. गांवकरी)




'सह्याद्री स्टार्टअप्स'च्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'ड्रोन इनोव्हेशन' उपक्रम आयोजित करण्यात आला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना ड्रोन तंत्रज्ञान, स्टार्टअप संस्कृती आणि प्रत्यक्ष उद्योगजगताचा अनुभव देण्यात आला. हा कार्यक्रम सेरेब्रोस्पार्क इनोव्हेशन्स (Cerebrospark Innovations Pvt. Ltd.) या ड्रोन क्षेत्रातील स्टार्टअपच्या सहकार्याने पार पडला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना वर्गातील शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष उद्योगातील कामकाजाची ओळख करून देण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कंपनीच्या संस्थापक गणेश थोरात, मिहीर केदार आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या उद्योजकीय प्रवासाबाबत माहिती दिली. स्टार्टअप उभारणीतील आव्हाने, संधी आणि ड्रोन क्षेत्रातील वाढत्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर आयोजित कार्यशाळेत विद्यार्थ्यांना ड्रोनची रचना, त्यातील महत्त्वाचे घटक तसेच विविध क्षेत्रांतील उपयोग याची माहिती देण्यात आली. संवादात्मक सत्रामुळे विद्यार्थ्यांना तज्ज्ञांशी थेट चर्चा करण्याची संधी मिळाली.

या उपक्रमामध्ये संशोधन व विकास प्रयोगशाळेचा (R&D Lab) अनुभवही विद्यार्थ्यांना देण्यात आला. येथे ड्रोनचा वापर सुरक्षा, सर्वेक्षण आणि संशोधनासाठी कसा केला जातो याची माहिती विद्यार्थ्यांना मिळाली. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे ड्रोन उड्डाणाचा प्रत्यक्ष अनुभव. तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक विद्यार्थ्याला ड्रोन उडविण्याची संधी देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांना नियंत्रण, स्थिरता आणि सुरक्षेचे मूलभूत तत्त्व समजण्यास मदत झाली.

या उपक्रमाबाबत सह्याद्री स्टार्टअप्सचे संस्थापक सलील उरुणकर यांनी सांगितले की, "विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांना प्रत्यक्ष अनुभव देणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवोपक्रम आणि उद्योजकतेची प्रेरणा निर्माण होते." विद्यार्थ्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला असून हा अनुभव प्रेरणादायी ठरल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यातही अशा अनुभवाधारित उपक्रमांचे आयोजन करण्याचा मानस सह्याद्री स्टार्टअप्सने व्यक्त केला आहे.





# श्रीक्षेत्र टाहाकारी जगदंबा मंदिराच्या दुरुस्तीला प्रारंभ

## पुरातत्त्व विभागाकडून गळती थांबविण्याचे काम सुरू!

अकोले : (स. गांवकरी)

टाहाकारी येथील श्रद्धास्थान असलेल्या श्री जगदंबा मातेच्या प्राचीन मंदिरातील गळती थांबविण्यासाठी पुरातत्त्व विभागाने अखेर दुरुस्तीच्या कामास सुरुवात केली आहे. गेल्या तीन ते चार वर्षांपासून ग्रामस्थांनी सातत्याने पाठपुरावा करून मंदिर संवर्धनासाठी अथक प्रयत्न केले होते. स्थानिक ग्रामस्थांनी हा विषय दिल्लीपर्यंत पोहोचवत शासन व प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मंदिराची पडझड होऊ नये तसेच पुढील पिढ्यांसाठी मंदिराचा पाया आणि कळस मूळ स्वरूपात जतन व्हावा, यासाठी ग्रामस्थांनी एकजुटीने प्रयत्न केले. या पाठपुराव्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खासदार डॉ. सुजय विखे पाटील लोखंडे, खासदार हेमंत गोडसे, खासदार राजाभाऊ वाजे, खासदार वाकचौरे तसेच माजी आमदार वैभव पिचड यांनी मोलाचे सहकार्य केले. विशेषतः माजी आमदार वैभव पिचड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्रव्यवहार करून मंदिर दुरुस्तीचा विषय प्रभावीपणे मांडला होता. विविध लोकप्रतिनिधींच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे अखेर पुरातत्त्व विभागाने मंदिराच्या जीर्णोद्धाराच्या कामाला हिरवा कंदील दिला. मंदिराच्या दुरुस्तीचे काम सुरू झाल्याने टाहाकारी ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, या कार्यासाठी मदत करणाऱ्या सर्व मान्यवरांचे ग्रामस्थांनी आभार मानत अभिनंदन केले आहे. "आपल्या सर्वांचे श्रद्धास्थान असलेल्या जगदंबा मातेच्या मंदिराचे मूळ वैभव अबाधित राखण्यासाठी ग्रामस्थांनी केलेल्या एकजुटीच्या प्रयत्नांना अखेर यश आले," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# सोनाली मेंगाळ मृत्यू प्रकरण: १४ महिन्यांनंतर आरोपी जेरबंद

अकोले : (स. गांवकरी)

- अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर अकोले पोलिसांची मोठी कारवाई!

सोनाली रावसाहेब मेंगाळ हिच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणात तब्बल १४ महिन्यांनंतर मोठी घडामोड घडली असून या प्रकरणातील आरोपींविरुद्ध अखेर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आली आहे. जिल्हा सत्र न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर अकोले पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपींना जेरबंद केले. त्यामुळे पीडित कुटुंबीयांना न्याय मिळण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल पडले आहे. या प्रकरणात आरोपींनी अटक टाळण्यासाठी जिल्हा सत्र न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपींच्या वतीने अ‍ॅड. के. डी. धुमाळ आणि अ‍ॅड. जे. एच. वामन यांनी बाजू मांडली, तर पीडितेचे वडील रावसाहेब मेंगाळ यांनी खासगी वकिलांची नियुक्ती करून आपली बाजू भक्कमपणे मांडली. सुनावणीदरम्यान सरकारी वकील वाघचौरे आणि विजय उगले यांनी प्रभावी युक्तिवाद केल्याने न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. जामीन फेटाळल्यानंतर अकोले पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप हजारे आणि त्यांच्या विशेष पथकाने तातडीने हालचाली सुरू करून सापळा रचत आरोपींना अटक केली. अटकेनंतर आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात कठोर परिश्रम घेऊन आरोपींना जेरबंद केल्याबद्दल फिर्यादी रावसाहेब वामन मेंगाळ यांनी पोलीस निरीक्षक मोहन बोरसे, सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप हजारे आणि संपूर्ण अकोले पोलीस पथकाचे आभार मानत अभिनंदन केले आहे.

# भिंगार येथे विराट हिंदू संमेलनास उस्फूर्त प्रतिसाद

## शंभर वर्षाच्या संघ वाटचालीमुळे भारत मातेला परमोच्च वैभव प्राप्त होऊन भारत हा विश्व गुरु होईल-विवेक कुलकर्णी

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




अहिल्यानगर येथे हिंदूत्व संपवण्यासाठी आलेला औरंगजेबाला भिंगारकरांनी याच भूमीत गाडले आहे.हिंदू सनातन आहेत,हिंदू संस्कृती व परंपरेवर हजारो वर्षापासून आक्रमणे झाली तरीदेखील हिंदू संस्कृती टिकली आहे.हिंदुचा स्वाभिमान कमी होत आहे.तेव्हा हिंदूचा स्वाभिमान व शक्ती जागृत करण्यासाठी १९२५ साली पूजनीय डॉ.केशव हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली.संघाचे संघटन कार्य पाहून जग म्हणते आम्हाला आत्म भावनेने संघटित व्हायचे असेल.तर संघा सारखे संघटन कौशल्य आम्हाला हवे आहे.असे संपूर्ण जगाला वाटत आहे.

जगामध्ये विवांचना आहे,युद्ध आहे,आक्रमकता आहे परंतु भारतात प्रभू श्रीरामाचे भव्य मंदिर आहे.बाबरी चा ढाचा गीता जयंतीला पडला. ढाचा पडल्यानंतर देशात त्याचे तीन प्रमुख परिणाम झाले. हिंदू समाज जातीपातीत विभागला होता तो समरस झाला धार्मिकदृष्ट्या हिंदू कट्टर झाला राजकीय दृष्ट्या हिंदू जागृत झाला. १९९२ पूर्वी देशात मुस्लिम वोट बँक होती परंतु ९२ सालाच्या बॉम्बस्फोट नंतर देशात राजकीय पक्षाला हिंदू समाजामध्ये काय चाललंय याचा विचार करावा लागला आहे. विश्व पटलावर हिंदूंच्या समस्या कोण मांडेल?विश्वामध्ये हिंदूंना एकत्र कोण करेल?वनवासी समाजाच्या समस्या,हिंदू माता भगिनींच्या समस्या कोण मांडणार ? सर्व हिंदू समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी साधुसंतांना एकत्र करून संतांच्या आदेशानुसार विश्व हिंदू परिषदेची स्थापना करण्यात आली.तसेच कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी भारतीय मजदूर संघाची स्थापना करण्यात आली. संघाची १०० वर्षाची वाटचाल काय आहे? हे समजून घेण्यासाठी विराट हिंदू संमेलन देशभर होत आहेत.

१९४७ साली भारताची पाहणी होईल असे कोणालाही वाटले नव्हते.तरी पाकिस्तान हा धर्माच्या नावाखाली वेगळा झालाच.नेपाळ,बांग्लादेश, श्रीलंका,इराक,इराण यांचे आज जरी काही वेगळे चालले असले तरी ईश्वराच्या,विधी व नियतीच्या नूसार २०४७ साली अखंड भारत निर्माण होईल. अशी वाटचाल भारत देशात सुरू आहे.शंभर वर्षाच्या संघ वाटचालीमुळे भारत मातेला परमोच्च वैभव प्राप्त होऊन भारत हा विश्व गुरु होईल.असे प्रतिपादन अखिल भारतीय बजरंग दलाचे सहसंयोजक विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

भिंगार येथील श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.भिंगार येथील प्राचीन मारुती मंदिरापासून भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते.या शोभायात्रेत या मिरवणुकीत हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. या शोभायात्रेचा समारोप श्री शुक्लेश्वर महादेव मंदिर येथे करण्यात आला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## अहिल्यानगरच्या 'सिव्हिल'मध्ये शासकीय मेडिकल कॉलेज सुरू

■ पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नामकरण

मुंबई/अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यात नव्याने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय मेडिकल कॉलेज, अहिल्यानगर' यंदापासून सुरू होत आहे. मागील वर्षी ६ मे २०२५ रोजी अहिल्यादेवीचे जन्मस्थळ चौंडी (ता. जामखेड) येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या मेडिकल कॉलेजची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली होती. त्या घोषणेची अंमलबजावणी वर्षभरात महायुती सरकारने केली आहे. विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी या कॉलेजची मागणी केली होती. तिची दखल घेत मुख्यमंत्री फडणवीस यांनी यंदापासूनच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर गव्हर्नमेंट मेडिकल कॉलेज सुरू होत असल्याची घोषणा सोमवारी (२७ एप्रिल) केली. यामुळे नगरच्या सिव्हिल हॉस्पीटलमध्ये १०० विद्यार्थी संख्या आणि ४३० बेडची क्षमता असलेले वैद्यकीय कॉलेज-रुग्णालय सुरू होत असून या कॉलेजची प्रवेश प्रक्रिया याचवर्षी २०२६ पासून सुरू होत आहे.

## निर्मलनगरला अखंड हरिनाम, ज्ञानेश्वरी पारायणाची सांगता

अहिल्यानगर (स. गांवकरी) : सावेडी उपनगरातील निर्मलनगर येथील दत्त मंदिरात अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे येथील ग्रामस्थ, भजनी मंडळ, निर्मलनगर प्रतिष्ठाण तर्फे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहाचे हे 8 वे वर्ष होते. या सप्ताहासाठी संपूर्ण निर्मलनगर परिसरातील भाविकांचे मोठ्या प्रमाणात स्वतःहून मोठे योगदान मिळते. या सप्ताहामध्ये गेले 7 दिवस पहाटे 5 ते 7 काकडा, सकाळी 7 ते 8 विष्णुसहस्रनाम, सकाळी 8: 30 ते 11: 30 ज्ञानेश्वरी पारायण असे कार्यक्रम पार पडले तर दुपारच्या सत्रात दुपारी 2 ते 4 भजनी संध्याचा कार्यक्रम पार पडला.सायंकाळी 5 ते 6 हरिपाठ, रात्री हरीकीर्तन तसेच रात्री 8 ते 10 कीर्तनाचा कार्यक्रम पार पडला. यामध्ये नामवंत कीर्तनकारांनी सहभाग घेतला. ह भ प कृष्णा महाराज रायकर राम महाराज घुले आबा महाराज कातोरे अमोल महाराज जाधव रामदास महाराज रक्ताटे ज्ञानेश्वर महाराज भिसे कारभारी महाराज झरेकर यांनी सुंदर असे कीर्तन सादर केले. सकाळी ८.३० ते ११.३० ज्ञानेश्वरी पारायण व्यासपीठ चालक हभप विद्याताई हारदे यांनी वाचन केले. भक्ती संध्या कार्यक्रमात निर्मलनगर, लक्ष्मी नगर,शिवनगर, सूर्यनगर,तवले नगर, ढवणं वस्ती,भगवान बाबा चौक येथील भजनी मंडळांनी सहभाग घेतला होता. या कार्यक्रमाला गायन हभप रवींद महाराज आव्हाड, कानिफ महाराज पंडित, आरती महाराज हुलमुखे,यांनी केले तर त्यांना पिंपळगाव माळवी येथील भक्ती वेदांत गुरुकुल वारकरी शिक्षणसंस्थेच्या विद्यार्थ्यांनी साथ दिली. मृदुंगाचार्य हभप श्रीकांत महाराज कोहोक, ओंकार महाराज उनवणे यांनी केले. या अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याची सांगता हभप श्रीनिवास महाराज घुगे यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी भाविक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. काल्याचे कीर्तनानंतर महाप्रसादाला लाभ सर्व भाविकांनी घेतला. सप्ताहाचे संयोजक, आयोजक यांनी विशेष परिश्रम घेऊन सप्ताहाची सांगता यशस्वीपणे पार पाडली याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.

## केडगाव परिसरात प्रॉपर्टी नावावर करून देण्यासाठी वडिलांना मारहाण

अहिल्यानगर (स. गांवकरी) : केडगाव परिसरातील वैष्णवनगर येथे मालमत्तेच्या वादातून मुलानेच आपल्या वडिलांवर लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना रविवारी (२६ एप्रिल) रात्री आठच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी जखमी वडिलांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. सदाशिव शंकर भिंगारदिवे (वय-६१, रा. तिरंगा चौक, वैष्णवनगर, केडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते निवृत्त सुभेदार असून कुटुंबासह राहतात. त्यांचा मुलगा शिवम भिंगारदिवे (वय-२५) याला गांजा व मद्याचे व्यसन असून तो वारंवार पैशांसाठी घरात वाद घालत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. रविवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. त्यावेळी सर्वजण घरी असताना शिवम याने वडिलांना त्यांच्या नावावरील सर्व मालमत्ता स्वतःच्या नावावर करून देण्याची मागणी केली. मात्र, सदाशिव भिंगारदिवे यांनी मुलगा कोणतेही काम करत नसल्याने तसे करण्यास नकार दिला. यामुळे संतप्त झालेल्या शिवमने हातातील लोखंडी रॉडने वडिलांना मारहाण केली. या हल्ल्यात सदाशिव यांच्या कपाळाला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. तसेच मुलाने मालमत्ता माझ्या नावावर केली नाही तर जिवंत सोडणार नाही अशी धमकी देत शिवीगाळ केल्याचेही फिर्यादीत नमूद आहे. आरडाओरडा ऐकून घरातील इतर सदस्यांनी हस्तक्षेप करून भांडण थांबवले. घटनेनंतर जखमी भिंगारदिवे यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी मुलाविरोधात गुन्हा नोंद केला आहे.

## पिक विमा रखडल्याने तालुक्यातील शेतकरी आक्रमक



नेवासा (स. गांवकरी) : खरीप हंगाम २०२५-२६ च्या झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील शेतकऱ्यांनी कपाशी, तूर, सोयाबीन यांसारख्या पिकांचे नुकसान झाले होते. शेतकऱ्यांना शासकीय अनुदानासोबतच प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत नुकसान भरपाई मिळणे अपेक्षित होते. मात्र, आता - रब्बी हंगाम संपत आला असून मार्चएण्ड सुरू आहे. तरीही खरीप आणि रब्बी हंगामातील पिकविमा शेतकऱ्यांना मिळालेला नाही. यामुळे पिकविमा कंपनी आणि सरकारकडून शेतकऱ्यांचा खेळ सुरू असल्याचा आरोप होताना दिसत आहे.अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्याप पिक विम्याची कोणतीही भरपाई मिळालेली नाही. तालुक्यात अतिवृष्टीने खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले असतानाही शासनाने दिलेले शंभर टक्के भरपाईचे आदेश प्रत्यक्षात कागदावरच राहिल्याचे चित्र आहे. आदेश निघूनही बाधित शेतकऱ्यांना आजपर्यंत कोणताही प्रत्यक्ष लाभ मिळालेला नाही. अनेकांनी ऑनलाईन तक्रारी दाखल करूनही प्रशासन व संबंधित विमा कंपनीकडून प्रतिसाद मिळत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत.या पार्श्वभूमीवर जीवन ज्योत फाऊंडेशनचे कमलेश नवले पाटील यांनी शासनाला निवेदन देत तात्काळ पिक विमा रक्कम वितरित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, येत्या १५ दिवसांत सकारात्मक निर्णय न झाल्यास नेवासा तालुका कृषी कार्यालयात शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. दरम्यान, या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, ग्रामविकास विभाग, जिल्हाधिकारी, कृषी अधिकारी तसेच पोलीस प्रशासनाला पाठवण्यात आल्या आहेत. शेतकऱ्यांच्या या मागणीकडे प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# राजेंद्र खिलारी यांना 'आजीवन विशेष कार्यगौरव' पुरस्कार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




मुंबई उच्च न्यायालयात कक्ष अधिकारी म्हणून कार्यरत असलेले नगरचे सुपुत्र श्री.राजेंद्र एकनाथ खिलारी यांना त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी आणि शैक्षणिक योगदानासाठी राष्ट्रीय पातळीवरील मानाचा "शासकीय विधी प्रशासन क्षेत्रातील आजीवन विशेष कार्यगौरव (वरिष्ठ)" हा प्रतिष्ठित पुरस्कार बहाल करण्यात आला आहे.

हा सन्मान सोहळा नुकताच दिल्ली येथे पार पडला. यावेळी राष्ट्रीय उत्कृष्टता पुरस्कार 2026 या भव्य समारंभात प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात एच.इ. म्मे इल्दजीमा बह्रा मल्लोट (चाड प्रजासत्ताकाच्या राजदूत), एच.इ.यानो एडेम एकपेमडो (टोगो प्रजासत्ताकाचे राजदूत) आणि श्री. मदन लाल (माजी भारतीय क्रिकेटपटू, १९८३ विश्वचषक विजेते) यांच्या हस्ते हा मानाचा पुरस्कार देण्यात आला, ही नगरकरांसाठी अत्यंत अभिमानाची बाब ठरली आहे.

श्री. राजेंद्र खिलारी यांनी आजपर्यंत एकूण ९ पदव्या व पदव्युत्तर पदव्या संपादन करून आपल्या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय ठसा उमटवला आहे. तसेच मुंबई उच्च न्यायालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या कल्याणासाठी त्यांच्या आरोग्यासाठी केलेले त्यांचे कार्यही विशेष कौतुकास्पद आहे. त्यांच्या निष्ठा, प्रामाणिकपणा आणि सातत्यपूर्ण उत्कृष्ट सेवेमुळेच त्यांना हा सर्वोच्च सन्मान प्राप्त झाला आहे.

त्यांच्या या यशामुळे केवळ मुंबई उच्च न्यायालयाचा नव्हे, तर संपूर्ण न्यायव्यवस्थेचा गौरव वाढला असून अनेकांना प्रेरणा मिळत आहे. लक्ष्मी नगर सोसायटीचे माजी अध्यक्ष एकनाथ खिल्लारी यांचे ते चिरंजीव असून संगमनेर तालुक्यातील कनोली गावातील एका सर्वसामान्य कुटुंबातून त्यांनी शैक्षणिक खडतर प्रवास केला. या उल्लेखनीय यशाबद्दल नगरचे आमदार संग्राम जगताप, ऑल इंडिया हायकोर्ट कर्मचारी महासंघ, मुंबई उच्च न्यायालय कर्मचारी संघटना, लक्ष्मीनगर गृहनिर्माण संस्था चे सर्व पदाधिकारी, प्रभाग क्रमांक २ चे नगरसेवक निखिल वारे, महेश तवले, माजी नगरसेवक श्री. सुनील त्र्यंबके, बाळासाहेब पवार, तसेच न्यू आर्ट्स कॉलेज नगर येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटना, छत्रपती ट्रस्ट तसेच बी.कॉम १९९७ बॅचच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

अहिल्यानगर येथील त्यांचा खुप मोठा मित्र परिवार आहे. या परिवाराच्या वतीने श्री. राजेंद्र खिलारी यांना पुढील वाटचालीसाठी अधिक यश, कीर्ती आणि उत्तुंग कामगिरीच्या शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## डॉ.विखे पाटील अभियांत्रिकीत कॉग्नोत्सव उत्साहात संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

स्पर्धेच्या युगात आज प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी तांत्रिक अभ्यासा सोबतच विविध अभ्यासक्रम आणि अभ्यासेतर उपक्रमांचा देखील अनुभव घेण्याची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन फाउंडेशनचे तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे यांनी केले. विळद घाट येथील पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संगणक अभियांत्रिकी विभाग व संगणक अभियंता विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने "कॉग्नोत्सव-२०२६" या राज्यस्तरीय महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या प्रचंड प्रतिसादामुळे हा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या दोन दिवसीय महोत्सवामध्ये टेक केबिसी, युटोपिया (हॅकेथॉन) टेक ट्रेझर हंट, टेकएक्सलरेट, स्क्वीड गेम, रणभूमी, रंगमंच इत्यादी कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांचे कौशल्य दाखविण्याची सुवर्णसंधी प्राप्त झाली. सदर महोत्सवामध्ये राज्यभरातील सुमारे ३५ महाविद्यालयातून ७१० विद्यार्थांनी सहभाग नोंदविला. या वेळी तांत्रिक संचालक प्रा. सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, डॉ.रविंद्र तांबे, प्रा.सौ.विद्या जगताप, डॉ. दीपक दरंदले उपस्थित होते. "कॉग्नोत्सव-२०२६" च्या कार्यक्रम समन्वयक प्रा. रेणुका देवराय होत्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध मान्यताप्राप्त व्यावसायिक संस्था, संगणक विभागाचे प्रमुख प्रा.डॉ. एन.बी.विखे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, संगणक अभियंता, विद्यार्थी संघटनेचे सर्व विद्यार्थी यांनी विशेष सहकार्य केले. फाऊंडेशनचे डायरेक्टर टेक्निकल प्रा.सुनील कल्हापुरे, प्राचार्य डॉ.रवींद्र नवथर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

## 'सेवा हक्क दिन' निमित्त शपथविधी कार्यक्रम उत्साहात

### "आपली सेवा, आमचे कर्तव्य" संकल्पाने पारदर्शक व वेळेत सेवा देण्याचा निर्धार

ठाणे : (स. गांवकरी)




महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत २८ एप्रिल हा दिवस 'सेवा हक्क दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्यानुसार यावर्षी दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे येथे सेवा हक्क दिनानिमित्त शपथविधी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

जिल्हास्तरावर आयोजित या कार्यक्रमात जिल्हा परिषद प्रांगणात सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी एकत्र येऊन सेवा हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शपथ घेतली. नागरिकांना शासकीय सेवा पारदर्शक, वेळेत आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या कार्यक्रमास मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (स्वच्छ भारत मिशन) पंडित राठोड, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, उप मुख्य व लेखा अधिकारी अंजली अंबेकर, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) भाऊसाहेब मोहिते तसेच जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात सर्व उपस्थितांनी खालीलप्रमाणे शपथ घेतली: "मी, गांभीर्यपूर्वक शपथ घेतो की, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पद्धतीने, विहित कालमर्यादेत व सौजन्याने पात्र नागरिकांना देण्याकामी मला सुपूर्द करण्यात आलेली जबाबदारी पूर्ण प्रामाणिकतेने, निष्ठेने, सचोटीने, संवेदनशीलतेने व तत्परतेने पार पाडण्यासाठी मी कटिबद्ध राहीन.

मी सेवा वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही यासाठी आवश्यक पावले उचलेन.

मी नागरिकांना कायद्याने प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून सेवा भावनेतून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ कार्य करेन."

'सेवा हक्क दिना'च्या निमित्ताने जिल्हा परिषद प्रशासनाने पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि कार्यक्षमता यांना प्राधान्य देत नागरिकांना दर्जेदार सेवा देण्याचा पुनरुच्चार केला. या उपक्रमामुळे प्रशासन आणि नागरिक यांच्यातील विश्वास अधिक दृढ होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## जिल्हा आरोग्य विभागाकडून गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमाला गती

### NQAS अंतर्गत आरोग्य सेवांची गुणवत्ता उंचावण्यावर भर; ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांना मानांकन प्रमाणपत्र प्राप्त

ठाणे : (स. गांवकरी)




जिल्ह्यातील नागरिकांना दर्जेदार, सुरक्षित आणि कार्यक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागामार्फत गुणवत्ता आश्वासन कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत ठराविक कार्यप्रणालीद्वारे आरोग्य सेवांचा दर्जा निश्चित करून त्यानुसार गुणवत्ता तपासणी व सातत्याने सुधारणा करण्यात येत असून, त्यामुळे आरोग्य सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि सुरक्षित पद्धतीने नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांमार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांची गुणवत्ता उत्तरोत्तर वाढविणे हा आहे. तसेच आरोग्य संस्थांच्या उपयोगितेत वाढ करून अधिकाधिक लाभार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देणे हेही या कार्यक्रमाचे प्रमुख ध्येय आहे.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार National Quality Assurance Standard (NQAS) अंतर्गत जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) तसेच उपकेंद्र (SC) यांची गुणवत्ता निश्चित करण्यासाठी सविस्तर चेकलिस्ट जारी करण्यात आलेली आहे.

सन २०२६ या आर्थिक वर्षात जिल्ह्यातील DH, GH, SDH, RH, PHC व SC या सर्व स्तरांवरील आरोग्य संस्थांचे NQAS मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

जिल्हा गुणवत्ता आश्वासन कक्षामार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक मूल्यांकनात ७०% पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या संस्थांना राज्यस्तरीय मूल्यांकनासाठी पाठविण्यात येते. त्यानंतर राज्यस्तरीय मूल्यांकनातही ७०% पेक्षा जास्त गुण प्राप्त करणाऱ्या संस्थांची NQAS मानांकन प्रमाणपत्रासाठी शिफारस करण्यात येते. जिल्ह्यातील एकूण ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी ४ प्राथमिक आरोग्य केंद्रांना NQAS मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करण्यात यश आले असून, उर्वरित केंद्रांना मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी सज्ज करण्याचे काम वेगाने सुरू आहे.

या उपक्रमामुळे आरोग्य संस्थांमधील सेवा वितरण अधिक शिस्तबद्ध, रुग्णकेंद्री व गुणवत्तापूर्ण होत असून, नागरिकांचा विश्वास अधिक दृढ होत आहे. स्वच्छता, सुरक्षितता, वेळेवर सेवा, प्रशिक्षित मनुष्यबळ व प्रभावी व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात येत आहे.

जिल्हा आरोग्य विभागाकडून पुढील काळात अधिकाधिक आरोग्य संस्थांना NQAS मानांकन प्रमाणपत्र प्राप्त करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येणार असून, "गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा प्रत्येकापर्यंत" हा उद्देश साध्य करण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले.

## जनगणना २०२७ तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

नवीन नांदेड : (स. गांवकरी)



जनगणना 2027तीन दिवसीय कार्य शाळेचे आयोजन मनपाचे प्रभारी अधिकारी तथा सहायक आयुक्त डॉ मिर्झा बेग कार्यालय क्रमांक सहा सिडको अंतर्गत जनगणना 2027 चे काम सुरू झाले असून या अंतर्गत 190 कर्मचारी प्रगंणक व पर्यवेक्षक यांची नियुक्ती करण्यात आली असून कर्मचारी यांचे जनगणना प्रशिक्षण इंदिरा गांधी महाविद्यालय सिडको येथे आयोजन करण्यात आले आहे, या प्रशिक्षण शिबिरास पहिली तुकडीचे प्रशिक्षण 28 ते 30 एप्रिल दरम्यान होणार असून, तीन तुकड्यांना प्रशिक्षण 6 ते 8 मे रोजी तीन दिवसीय नियोजित होणार आहे या शिबिरास विशेष पॉलिटेक्निक कॉलेजचे आठ मुख्य प्रशिक्षक हे प्रशिक्षण देणार असून यात जनगणना दोन टप्यात होणार असून पहिल्या टप्यात प्रति प्रगणक 200 घरांची जनगणना करणार , पहिला टप्प्यात दि15 मे पासून 30 मे पर्यंत पार पडणार असून नंतर दुसरा टप्प्यात फेब्रुवारी 2027 मध्ये होईल यात प्रत्यक्ष नागरिकांची जनगणना होणार आहे सदर जणगणने साठी 25000 हजार रु मानधन शासनाच्या वतीने मिळणार असून सदर कामात जे प्रगणक व पर्यवेशक निष्काळजी पणा करतील त्यांच्यावर जनगणना अधिनियम 1948 मधील कलम 5/ 11 नुसार एक हजार रु दंड दोष सिध्द झाल्यास तीन वर्षा पर्यंत कारावास शिक्षा होऊ शकते नियमानुसार कडक कार्यवाही करण्यात येणार आहे जनतेस महानगरपालिके च्या वतीने राष्ट्रीय कामात सहकार्य करण्याचे आवहान करण्यात आले आहे.

# जय मल्हार विद्यालयात शिक्षणाची डिजिटल प्रणाली येणार!

## मुख्याध्यापक सेवापुर्ती गौरव समारंभात सचिव ॲड. पांडुरंग गायकवाड यांचा संकल्प

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




पिंपळगाव रोठा येथील जय मल्हार विद्यालयात विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री उत्तम गणपत सुंबरे यांचा सेवापूर्ती गौरव समारंभ २६ एप्रिलला विद्यालयात संपन्न झाला.

यावेळी संस्थेचे सचिव ऍड.पांडुरंग गायकवाड यांनी पुढील शैक्षणिक वर्षामध्ये जय मल्हार विद्यालयाच्या नवीन इमारतीमध्ये ग्रामीण भागातील गोरगरीब मुलांना, मुलींना डिजिटल शिक्षण देण्याचा संकल्प जाहीर केला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून श्री दिलीपराव थोरे, माजी शिक्षणाधिकारी अहिल्यानगर, ज्ञानदाता शिक्षण संस्था ठाणेचे अध्यक्ष श्री. सुनील फापाळे यांनी तडफदार भाषणाने श्रोत्यांना प्रोत्साहित केले.सुंबरे सर यांच्या बद्दल त्यांनी आठवणी काढून भावनिक वातावरण तयार केले. मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित हे उपस्थित होते. तालुक्यातील प्रमुख प्राचार्य, मुख्याध्यापक, शिक्षक,पाहुणे, नातेवाईक, ग्रामस्थ,पालक याप्रसंगी उपस्थित होते. अध्यक्षीय भाषणात ॲड. गायकवाड पुढे म्हणाले की, शहरी भागातील मुलांची स्पर्धा करण्या करता ग्रामीण,गोरगरीब मुलांना डिजिटल शिक्षण देऊन त्यांना सक्षम बनवण्यासाठी विद्यालयांमध्ये नवीन इमारत पूर्ण होत असून शाळेत यापुढे डिजिटल शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच सुंबरे सरांनी पुढील काळात शिक्षण तज्ञ म्हणून शिक्षण क्षेत्रात काम करावे अशी अपेक्षाही व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे थोरे यांनी आपल्या भाषणांमधून विद्यालयाबाबतच्या काही आठवणी यावेळी सांगितल्या. मुख्याध्यापक सुंबरे सर यांच्या बद्दल बोलताना त्यांनी आठवणी व सकारात्मक कार्यशैली बाबत आपल्या कार्यकाळातील आठवणीना उजाळा दिला . शाळेची होत असलेली प्रगती याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. यावेळी मुख्याध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील पंडित, मुख्याध्यापक सर्वश्री रामराव पवार ,अशोक ठुबे , बाबासाहेब दाते सर,संगमनेर येथील संजय वाळे सर, माजी विद्यार्थी राजाराम मुंडे, पोपट सुंबरे, ग्रामस्थ जालिंदर खोसे, बाबाजी जगताप, लक्ष्मण सुंबरे यांनीही सुंबरे सर यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा भाषणात दिल्या. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सुद्धा आपल्या भाषणांमधून सुंबरे सरांबद्दलच्या भावना व्यक्त केल्या.

या कार्यक्रमाला उपस्थित तालुक्यातून मुख्याध्यापक सुदाम दळवी , मुख्याध्यापक राजेंद्र वाघ ,प्राचार्य संदीप मस्के , मुख्याध्यापक सर्वश्री संतोष ठाणगे , वाळुंज सर, , रसाळ सर, , देंडगे सर, , सपकाळ सर व आबासाहेब गायकवाड सर, कानूर पठार येथील जनता विद्या मंदिर चे प्राचार्य काळे सर, नानाभाऊ भांबरे, बबन चिमाजी पुंडे, जनार्धन महाराज मुंडे,माजी उपसरपंच दादाभाऊ पुंडे,तंटामुक्ती अध्यक्ष गोपीनाथ घुले,धोंडीभाऊ शेठ जगताप, गोरख जगताप, शंकर गायकवाड,किसन मुंडे,शांताराम खोसे, खंडू सुपेकर, दादाभाऊ नरवडे, बाबाजी जगताप, भाकरे सर,रेवण सुंबरे, राजाराम सुंबरे, अशोक सुंबरे, संतोष सुंबरे उपस्थित होते. यावेळी संस्थेचे सचिव गायकवाड यांनी सुंबरे सरांचा संपत्नीक सत्कार केला. विद्यालयाकडून सर्व शिक्षक कर्मचारी स्टाफ यांच्या वतीनेही सरांचा योग्य सन्मान केला गेला. इयत्ता आठवी व नववीच्या विद्यार्थ्यांनीही सुंबरे सर यांचा कार्याबद्दल सन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

# पीएच.डी. कोर्सवर्क परीक्षा उन्हाळी–2026 साठी अर्ज स्वीकृती प्रक्रिया सुरु

**नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)**




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या संकुल व संशोधन केंद्रांतील पीएच.डी. कोर्सवर्क अनुत्तीर्ण (Backlog) विद्यार्थ्यांसाठी उन्हाळी–२०२६ परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. सदर परीक्षा प्रचलित पद्धतीनुसार ऑफलाईन व लेखी (Pen & Paper) स्वरूपात घेण्यात येणार असून संबंधित विद्यार्थ्यांनी आपली परीक्षा अर्ज प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे. विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज आपल्या संबंधित संशोधन केंद्र किंवा संकुल येथे सादर करावेत. परीक्षा शुल्क रुपये ३१०/- इतके निश्चित करण्यात आले आहे. अर्ज स्वीकृतीचा कालावधी ४ ते ७ मे २०२६ असा आहे. संशोधन केंद्रांनी परीक्षा अर्जाचे शुल्क धनादेश/ RTGS/NEFT द्वारे "लेखाधिकारी, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड" यांच्या नावे आयडीबीआय बँक, लोहटी कॉम्प्लेक्स, वजीराबाद, नांदेड येथील खाते क्रमांक :- 0500104000028422 या खात्यावर जमा करावे.

संबंधित IFSC कोड IBKL0000500 आहे. शुल्क भरण्याची अंतिम तारीख ८ मे २०२६ असून, संशोधन केंद्रांनी अर्ज व शुल्कासह परीक्षा विभागात सादर करण्याची अंतिम मुदत ११ मे २०२६ निश्चित करण्यात आली आहे.

सर्व संबंधित विद्यार्थी, संशोधक व मार्गदर्शकांनी वरील सूचनांचे पालन करून निर्धारित कालावधीत प्रक्रिया पूर्ण करावी, असे विद्यापीठाच्या वतीने कळविण्यात आले आहे.




ठाणे : दिवा स्टेशनबाहेर भीषण अग्नितांडव पहावयास मिळाला. धमाका चायनीज कॉर्नर मध्ये गॅस गळतीमुळे लागलेल्या आगीने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. गॅस सिलिंडरने अचानक पेट घेतल्याने प्रवाशांची मोठी धावपळ उडाली. सुदैवाने नागरिकांनी तत्परतेने पावले उचलल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

**(फोटो - संतोष पडवळ)**

## थोडक्यात बातम्या...

### भारतातील अब्जाधीश लोकसंख्या पुढील पाच वर्षांत ५१% ने वाढणार : नाइट फ्रँक

पुणे **(स. गांवकरी)** : आघाडीची स्वतंत्र जागतिक प्रॉपर्टी कन्सल्टन्सी कंपनी नाइट फ्रँक यांनी त्यांच्या प्रतिष्ठित द वेल्थ रिपोर्ट च्या २०व्या आवृत्तीचे प्रकाशन केले. या अहवालात भौगोलिक-राजकीय अनिश्चितता, वाढत्या व्याजदरांबाबतची चिंता आणि असमान आर्थिक कामगिरी असूनही जागतिक संपत्ती निर्मितीत झालेली मोठी गतीवाढ स्पष्ट करण्यात आली आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत जगातील अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ व्यक्तींची (UHNWI, USD 30m+) संख्या १,६२,१९१ ने वाढली - म्हणजे दररोज सरासरी ८९ नवीन UHNWIs - आणि त्यामुळे जागतिक एकूण संख्या ७,१३,६२६ वर पोहोचली आहे. भारताची अल्ट्रा-हाय-नेट-वर्थ (UHNW) व्यक्तींची कहाणी ही जलद विस्तारानंतर मोठ्या प्रमाणावर झालेल्या एकत्रीकरणाची आहे. २०२१ ते २०२६ या कालावधीत USD 30 mn+ लोकसंख्या ६३% ने वाढली असून, ती सुमारे १२,००० पेक्षा थोडी अधिक असलेल्या संख्येतून १९,८७७ पर्यंत पोहोचली आहे. ही वाढ तंत्रज्ञान, औद्योगिक क्षेत्रे आणि भांडवली बाजारांमधील अभूतपूर्व संपत्ती निर्मितीचे प्रतिबिंब आहे. देश आता जगातील सहाव्या क्रमांकाची सर्वात मोठी UHNWI लोकसंख्या असलेला देश आहे.

### मुदखेड पोलिसांची मोठी कारवाई; दोघे ६ महिन्यांसाठी तडीपार

मुदखेड **(स. गांवकरी)** : शहर व पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी मोठी कारवाई करत पोलीस ठाण्यात यापूर्वी गंभीर गुन्ह्याची नोंद असलेल्या दोनजणांना सहा महिन्यांसाठी जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ५५ अंतर्गत ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींमध्ये असद चाऊस गौसअहमद चाऊस (२६) आणि मोहम्मद फैजान मो. इब्राहिम (२३) दोघेही रा. बागमार गल्ली, मुदखेड यांचा समावेश आहे. या दोघाविरुद्ध विविध गंभीर गुन्ह्यांची नोंद असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलीस निरीक्षक धिरज चव्हाण यांनी सादर केलेल्या प्रस्तावावरून प्रभारी उपविभागीय पो अ संजीवन मिरकले यांच्या मार्फत अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांकडे अहवाल पाठविण्यात आला होता. त्यानुसार पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी १६ एप्रिल रोजी अंतिम आदेश जारी करत या दोन्ही आरोपींना सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले. कालावधीत या आदेशानुसार पुढील सहा महिन्यांच्या संबंधित आरोपींना पोलीस अधीक्षकांच्या परवानगीशिवाय नांदेड जिल्ह्यात प्रवेश करता येणार नाही. आदेशाचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करूनही गुन्हेगारी प्रवृत्तीत सुधारणा होत नसल्यामुळे 'ऑपरेशन फ्लॅश आऊट' अंतर्गत ही कारवाई करण्यात येत आहे.

### महानगरपालिकेत सेवा हक्क दिन साजरा

ठाणे **(स. गांवकरी)** : ठाणे महानगरपालिकेत आज दिनांक 28/04/2026 रोजी "सेवा हक्क दिन" साजरा करण्यात आला. सेवा हक्क दिनाचे औचित्य साधून विविध सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी सकाळी ११:०० वा. महापालिकेच्या कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात उपस्थित राहून एकत्रितपणे शपथ घेतली. यावेळी महापौर शर्मिला पिंपळोलकर, आयुक्त सौरभ राव, अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे, उपायुक्त मनिष जोशी, जी.जी. गोदेपुरे, मधुकर बोडके यांच्यासह सहायक आयुक्त व विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. सेवा हक्क दिनानिमित्त विविध उपक्रम राबवून हा दिवस जनसहभागासह साजरा करावा व नागरिकांमध्ये उक्त अधिनियमाबाबत, राज्य सेवा हक्क आयोगाबाबत तसेच आपले सरकार पोर्टल मार्फत ऑनलाईन उपलब्ध सेवांबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत शासनाने सर्व शासकीय कार्यालयाना सूचना दिलेल्या आहेत. आज ठाणे महापालिकेत सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम-2015 अंतर्गत शासनाच्या सेवा पारदर्शक पध्दतीने, विहीत कालमर्यादित, प्रामाणिकतेने, निष्ठेने व तत्परतेने पार पाडण्याची शपथ घेतली. तसेच प्राधिकरणात येणाऱ्या नागरिकांना उक्त कायद्याने प्रदान केलेल्या सेवेच्या हक्काचा आदर ठेवून व सेवाभाव ठेवून त्यांच्या हितार्थ व कल्याणार्थ काम करण्याची शपथ घेतली.

### काँग्रेसची बहुमत, वघईत टाय तर सुबीरमध्ये भाजपाची आघाडी

डांग, गुजरात **(स. गांवकरी)** : डांग जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होताच भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांत मिश्र प्रतिक्रिया दिसून आल्या आहेत. जिल्ह्यातील तिन्ही तालुका पंचायतांमध्ये वेगवेगळे राजकीय चित्र दिसून येत असल्याने राजकीय वातावरण तापले आहे. आहवा तालुका पंचायतमध्ये काँग्रेसचा दबदबा दिसून आला आहे. एकूण १६ जागांपैकी काँग्रेसने ९ जागा जिंकून बहुमत मिळवले, तर भाजपला ७ जागांवर समाधान मानावे लागले. अनेक वर्षे भाजपचा गड मानला जाणारा आहवा आता काँग्रेसच्या ताब्यात गेला असून राजकीय समीकरणात मोठा बदल झाला आहे. वघई तालुका पंचायतमध्ये टायची स्थिती निर्माण झाली आहे. १६ पैकी भाजप आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांना ८-८ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे सत्तास्थापनेसाठी दोन्ही पक्षांकडून समझोता किंवा आघाडीची राजकारण पुढे येण्याची शक्यता आहे. सुबीर तालुका पंचायतमध्ये भाजपाने स्पष्ट बहुमत मिळवले आहे. १६ पैकी १२ जागा जिंकून भाजप मजबूत स्थितीत आहे, तर काँग्रेसला केवळ ४ जागा मिळाल्याने तिचा प्रभाव मर्यादित राहिला आहे. एकूणच तिन्ही तालुक्यांमध्ये मतदारांनी मिश्र कौल दिल्याचे स्पष्ट झाले आहे. सुबीरमध्ये भाजप मजबूत, आहव्यात काँग्रेस आघाडीवर आणि वाघईत टायमुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे.

# पारनेरच्या पश्चिम भागातील शेतकरी प्रशासनाविरुद्ध एकवटले

## *पळसपुर सबस्टेशनवर राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन*

**कमी दाबाने वीजपुरवठ्यामुळे पिके धोक्यात, प्रशासनाविरोधात संताप**

**पारनेर : (स. गांवकरी)**

विद्युत महामंडळाच्या ढिसाळ आणि निष्काळजी कारभारामुळे पळसपुर, काटाळवेढा, म्हसोबा झाप परिसरातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. गावात सबस्टेशन उपलब्ध असतानाही सातत्याने होणारा कमी दाबाचा वीजपुरवठा आणि अघोषित भारनियमामुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल उगले व म्हसोबा झापचे सरपंच प्रकाश गाजरे यांच्या नेतृत्वाखाली सबस्टेशनवर धडक देत आंदोलन केले.

पळसपुर म्हसोबा झाप परिसरात कांदा, टोमॅटो, फळबागा, मिरची आणि भुईमूग ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. सध्या कडाक्याच्या उन्हामुळे पाण्याची पातळी खालावली असून उपलब्ध पाणी पिकांना देण्यासाठी विजेची नितांत गरज आहे. मात्र, सबस्टेशन असूनही वीजपुरवठा सुरळीत नसल्याने आणि व्होल्टेज कमी असल्याने शेतीचे पंप चालवणे कठीण झाले आहे. यामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत. सरकारच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत या भागात कामांचे नियोजन करण्यात आले होते, मात्र या योजनेचा बोजवारा उडाला असून कामे प्रलंबित आहेत. नवीन वीज जोडण्या आणि पायाभूत सुविधांची कामे रेंगाळल्याने सरपंच प्रकाश गाजरे यांनी प्रशासनाला तीव्र शब्दांत सुनावले. कामे तातडीने मार्गी लावून नवीन वीज जोडण्या न दिल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा गाजरे यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

वारंवार तक्रारी करूनही महामंडळाचे अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. सामाजिक कार्यकर्ते प्रवीण आहेर म्हणाले की, सबस्टेशन असूनही सेवा मिळत नसेल, तर ते केवळ प्रशासनाचे अपयश आहे.

या आंदोलनात राष्ट्रवादी पक्षाचे टाकळी ढोकेश्वर गटाचे नेते



अमोल उगले, सरपंच प्रकाश गाजरे यांच्यासह प्रवीण आहेर, अभय आहेर, आशुतोष आहेर, संजय आहेर, अनिकेत अडसरे, राजेश ढोले, राजू आहेर, सुनील आहेर, विनायक आहेर, मयूर शिंदे, तुषार अडसरे, बंटी वाघमारे, गणेश आहेर, सागर ढोले व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या आंदोलनामुळे आता विद्युत महामंडळ काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पळसपुर येथील आरडीएसएस योजनेचे काम पूर्ण झालेले असून विद्युत जोडणी बाकी आहे. विद्युत जोडणी त्वरित करण्यात यावी अन्यथा २९ एप्रिल २०२६ रोजी टाकळी ढोकेश्वर सबस्टेशन येथे आंदोलन करण्यात येईल असे म्हसोबाचा सरपंच प्रकाश गाजरे यांनी निवेदन देऊन सांगितले आहे.

पळसपुर, म्हसोबा झाप परिसरात शेतकरी दिवसरात्र कष्ट करून कांदा, टोमॅटो आणि फळबागा जगवत आहे. गावात सबस्टेशन असूनही जर शेतकऱ्याला कमी दाबाने वीज मिळत असेल, तर हा महावितरणचा मोठा निष्काळजीपणा आहे. प्रशासनाने शेतकऱ्यांच्या संयमाचा अंत पाहू नये, अन्यथा हे आंदोलन अधिक उग्र होईल. असा इशाराच राष्ट्रवादीचे नेते अमोल उगले व सरपंच प्रकाश गाजरे यांनी दिला आहे.

## २८४ केंद्रांवर सीईटी परीक्षा सुरू; तंत्रज्ञानावर आधारित प्रक्रियेमुळे सुरळीत

**गणोरे : (स. गांवकरी)**



महाराष्ट्रातील कॉमन एंट्रन्स टेस्ट (CET) २०२६-२७ ला राज्यभरात सुरळीत सुरुवात झाली असून, २८४ परीक्षा केंद्रांवर १६ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला उपस्थित होते. मोठ्या प्रमाणावर परीक्षा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रभावी नियोजन, समन्वय आणि मजबूत यंत्रणा कार्यरत असल्याचे दिसून आले आहे. परीक्षेतील एक महत्त्वाचा ठळक मुद्दा म्हणजे मुलींच्या सहभागात झालेली लक्षणीय वाढ. यामुळे स्पर्धात्मक परीक्षांमध्ये समावेशकता आणि संधींची समानता वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. CET आयुक्त दिलीप बी. सरदेसाई (IAS) यांच्या मार्गदर्शनाखाली CET सेलने या वर्षी पारदर्शकता, सुरक्षितता आणि कार्यक्षमतेसाठी विविध तंत्रज्ञानाधारित उपाययोजना राबवल्या आहेत. यामध्ये रिअल-टाइम परीक्षा देखरेखीसाठी केंद्रीकृत डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली, सीसीटीव्ही देखरेख, निरीक्षकांसाठी बॉडी कॅमेरे तसेच बायोमेट्रिक कपडताळणी यंत्रणांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांचा अनुभव सुधारण्यासाठी केंद्र नियुक्ती प्रक्रियेतही सुधारणा करण्यात आल्या असून, अधिकाधिक विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीच्या केंद्रांवर परीक्षा देण्याची संधी मिळाली आहे. तसेच, सर्व परीक्षा केंद्रांवर दर्जेदार व मानकीकृत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, ज्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक सोयीस्कर वातावरण मिळाले आहे. परीक्षेच्या सुरुवातीच्या टप्प्यात विद्यार्थ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, सुधारित प्रणाली, सुविधा आणि व्यवस्थापनामुळे परीक्षेचा अनुभव विद्यार्थ्यांसाठी समाधानकारक ठरत आहे. CET सेल संपूर्ण प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवून असून, उच्च दर्जाचे आयोजन सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# सह्याद्री अतिथीगृह येथे राज्यस्तरीय सोहळा

## जिल्हा परिषद ठाणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचा विशेष सन्मान

**ठाणे : (स. गांवकरी)**



"द्वितीय सेवा हक्क दिन" निमित्त आज, दि. २८ एप्रिल, २०२६ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्यस्तरीय सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास मा. मुख्य आयुक्त, महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोग यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या प्रमुख उपस्थितीत मान्यवरांची उपस्थिती लाभली.


या सोहळ्यात जिल्हा परिषद ठाणेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांचा "आदर्श आपले सरकार सेवा केंद्र" या नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीबद्दल विशेष सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत नागरिकांना वेळेत व पारदर्शक सेवा मिळाव्यात यासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन हा गौरव प्रदान करण्यात आला. या उपक्रमाद्वारे जिल्हा परिषद ठाणेने सेवा वितरण प्रक्रियेत गती, पारदर्शकता आणि सुलभता आणत नागरिकांना अधिक कार्यक्षम सेवा उपलब्ध करून दिल्या आहेत. "आदर्श आपले सरकार सेवा केंद्र" या संकल्पनेमुळे नागरिकांना शासकीय सेवा एकाच ठिकाणी, वेळेत आणि सोप्या पद्धतीने मिळू लागल्या असून, हा उपक्रम राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही प्रेरणादायी ठरला आहे.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात राज्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी सेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर द्यावा, असे सांगितले. तसेच नागरिककेंद्री प्रशासन उभारण्यासाठी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची गरज अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमात विविध जिल्ह्यांतील अधिकारी, कर्मचारी तसेच सेवा हक्क अधिनियमाच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र शासनाने नागरिकांना पारदर्शक, सुलभ आणि वेळेत शासकीय सेवा मिळाव्यात यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क (RTS) अधिनियम, २०१५ लागू केला आहे. या कायद्यामुळे नागरिकांना निश्चित कालमर्यादित सेवा मिळण्याचा कायदेशीर अधिकार प्राप्त झाला आहे. या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' महत्त्वाची भूमिका बजावत असून जिल्ह्यातील सर्व ४३१ ग्रामपंचायतींना 'आपले सरकार सेवा केंद्र'शी जोडण्यात आले असून त्यापैकी ३०७ केंद्रे चालक पद मंजूर आहेत. या माध्यमातून १००० पेक्षा अधिक शासकीय सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होत आहेत. याशिवाय 'Thane Doorstep Delivery' या उपक्रमांतर्गत सुमारे ४०० हून अधिक सेवा नागरिकांना घरपोच देण्यात येत असून आतापर्यंत ५५१२ पेक्षा अधिक सेवा वितरित करण्यात आल्या आहेत. या उपक्रमांमुळे नागरिकांचा वेळ व खर्च वाचत असून सेवा वितरणात पारदर्शकता वाढली आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग आणि दुर्गम भागातील नागरिकांना याचा मोठा लाभ होत आहे.

# '... तर आपल्या पक्षाचा विस्तार वेगाने करणे हेच उद्दिष्ट'

## केंद्रीय राज्यमंत्री व आरपीआयचे अध्यक्ष रामदास आठवले यांचे प्रतिपादन

**पुणे : (स. गांवकरी)**



रिपब्लिकन पक्षाच्या सर्व गटांनी आणि आंबेडकर चळवळीतील सर्व घटकांनी एकत्र यावे, यासाठी आंबेडकरी समाज आसुसलेला आहे. त्यासाठी आपण अनेकदा प्रयत्न केले आहेत. मात्र, एकत्रीकरण होणारच नसेल तर आपल्या पक्षाचा वेगाने विस्तार करणे हेच आपल्या समोरचे उद्दिष्ट आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, मातंग आघाडीचे प्रदेश अध्यक्ष अण्णा वायदंडे, मोहन जगताप, शाम सदाफुले, बसवराज गायकवाड, शशिकला वाघमारे, प्रवीण ओव्हाळ, विशाल शेळके, राजेश गाडे, ऋषिकेश गवळी, संजय खडसे, सुनिल जाधव, सुधीर वाघमोडे आदी उपस्थित होते. रिपब्लिकन पक्ष हा सर्व समाज घटकांना एकत्र जोडणारा पक्ष आहे. पक्षाला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत. छत्रपती संभाजीनगरमधील सामाजिक कार्यकर्ते रमेश अण्णा मुळे यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला असून; त्यांच्यावर पक्षाच्या मराठा आघाडीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या माध्यमातून मराठा आणि दलित समाजाला एकत्र जोडण्याचे पक्षाचे प्रयत्न असतील, असेही आठवले यांनी स्पष्ट केले. स्वातंत्र्योत्तर काळात समाजात उल्लेखनीय परिवर्तन झाले आहे. संविधानामुळे समाज एकसंध राहिलेला आहे. त्यामुळेच भारतात नेपाळ किंवा बांगलादेशसारखी अराजकाची स्थिती केव्हाही निर्माण होऊ शकत नाही.

मात्र, सामाजिक स्तरावर जातीभेद उठावदारपणे दिसत नसले तरी देखील अद्यापही काही ठिकाणी दलितांवर अत्याचाराच्या घटना घडत आहेत. त्यामुळे संपूर्ण परिवर्तनासाठी देशातील प्रत्येक नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी अपेक्षा आठवले यांनी व्यक्त केली. आम्ही देशाभरात पक्षविस्तारासाठी प्रयत्नशील असलो तरीही महाराष्ट्रात रिपब्लिकन पक्षाला सत्तेत पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही, अशी खंत व्यक्त करताना आठवले यांनी विधान परिषदेची एक जागा, दोन महामंडळाचे अध्यक्षपद आणि विविध महामंडळामध्ये 50 सदस्य पक्षाला मिळावे, अशी आग्रही मागणी देखील आठवले यांनी केली.

पुणे येथील आंबेडकर भवन च्या पाठीमागची जागा स्मारकासाठी देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आश्वासनाची त्वरित पूर्तता करण्यात यावी, कोरेगाव भीमा येथील विजय स्तंभाजवळ विजय स्मारकासाठी सरकारकडून 200 एकर जागा उपलब्ध व्हावी, अशा मागण्याही आठवले यांनी केल्या.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)